http://www.epitomejournals.com Vol. 2, Issue 12, December 2016, ISSN: 2395-6968

Epitome Journals
International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968 | Impact Factor = 3.656

# आदिवासी समाजासाठी माहिती साक्षरता : आजची गरज, उदयाची सोय





**कामडी लाशा बुधा**

वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर

मराठवाडा विद्यापिठ, औरंगाबाद.

**डॉ.वीणा कांबळे**

ग्रंथपाल,

वसंतराव नाईक महाविद्यालय,

औरंगाबाद.

Email: lasha.kamdi@gmail.com

## Abstract

सदरिल संशोधन निबंधात आदिवासी समाजाला वेगवेगळी माहिती साक्षरताची आज गरज, उदयाची सोय या विषयात मुळ वेगवेगळी माहिती साक्षरता घेतले आहे. आदिवासी समाज हा अत्यंत दुर्बल व तितकाच दुर्लक्षित असा घटक इतर समाजापेक्षा खुप वेगवेगळया माहिती साक्षरतेच्या बाबतीत मागासलेला आहे. त्यामुळे आदिवासी समाजापर्यंत वेगवेगळया माहिती साक्षरता हया लेखाच्या माध्यमातून आदिवासी व इतर समाजापर्यंत वेगवेगळया माहिती साक्षरता म्हणजे काय? माहिती साक्षरताचे उपयुक्तता जल साक्षरता, विधी साक्षरता, पर्यावरण साक्षरता, माध्यम साक्षरता, अर्थ साक्षरता, आहार साक्षरता, तंत्रज्ञान साक्षरता, असे वेगवेगळया माहिती साक्षरताची या लेखात अभ्यास करण्यात आले आहे.

## Keywords

ज्ञान, आदिवासी समाज, माहिती साक्षरता, गरज, सोय

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

## Research Paper

**प्रस्तावना :**

माहिती साक्षरता हा सध्याच्या युगातील काळाची गरज शब्द झालेला आहे. उपलब्ध असलेल्या ज्ञानाचे योग्य उपयोजन करण्याच्या द्वष्टिकोनातून प्रत्येक व्यक्तीच्या अंगी काही कौशल्ये असणे आवश्यक असते. या कौशल्यांच्या आधारावर सदर व्यक्ती आपला विकास साधु शकते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये माहिती साक्षरता असणे गरजेचे आहे. व माहिती तंत्रज्ञान हे विकासाच्या प्रत्येक क्षेत्राशी निगडित असल्याने यासंदर्भात माहिती साक्षरता असणे अधिक महत्वपूर्ण ठरत आहे. आदिवासी समाज हा अत्यंत दुर्बल व तितकाच दुर्लक्षित असा घटक आहे. या आदिवासी बांधवाच्या ऐतिहासिक, भौगोलीक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य व तांत्रिक वेगवेगळया माहिती साक्षरता मागोवा हा विषय अभ्यासावा अशा संशोधकाची मनातील एक सुप्त इच्छा या शोध निबंधा दुवारे पुर्ण करण्याचा प्रयास आदिवासीच्या जीवनाचा कलह अतिशय तिव्र आहे. आणि तरीही हे खडतर जीवन जगताना दिसत आहेत. आदिवासीनी जर शिक्षणाकडे आणि विविध वेगवेगळया माहिती साक्षरताकडे लक्ष केंद्रीत केले तर आदिवासीना कोणत्याच प्रश्नाना अडचन निर्माण होणार नाही. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक शैक्षणिक, व आरोग्यविषयी असे विविध प्रश्न सोडविण्यासाठी विविध प्रकारची माहिती साक्षरताची आजची गरज आहे. आणि उदयाची सोय होणार आहे.

**वेगवेगळी माहिती साक्षरता म्हणजे काय?**

आधुनिक युगात साक्षरता या शब्दाचा अर्थ केवळ लिहिता, वाचता येणे इतपतच मर्यादित राहीलेला नाही. अक्षरज्ञान असणे हा साक्षरतेचा मुळ अर्थ असला तरी समाजात वावरतांना वेगवेगळया प्रकारच्या माहिती साक्षरता असणे गरजेचे झाले आहे. साक्षरता हा शब्द पुढे पुढे अधिक व्यापक होत गेला आहे. जगताना आपल्याला जिथे जिथे, संबंध येतो. तिथे तिथे, त्या संदर्भात प्राथमिक स्वरूपाची माहिती असणे म्हणजेच साक्षरता असे मानले जाऊ लागले. पाण्याबदल पाण्याचे महत्त्व, पाण्याची समस्या या बदल सर्वसाधारण माहिती असणे म्हणजेच 'जलसाक्षरता' अशाच पध्दतीने पर्यावरण साक्षरता, वन साक्षरता, निर्सग साक्षरता, सामाजिक साक्षरता, राजकिय साक्षरता, सास्कृतिक साक्षरता, कृषी साक्षरता, अशा प्रकारच्या वेगवेगळया माहिती साक्षरता असणे काळाची गरज आहे. आदिवासी व इतर समाजाच्या आयुष्यात वेगवेगळया प्रसंगांमधील जुजबी स्वरूपाची माहिती असली. तेवढी साक्षरता असली तर आपले काम अडत नाही. निदान ते कसे करावे, कसे मार्गी लावावे, हे आपल्याला कळते. एकदा एकाच्या सायकलची चेन पडली. पडली म्हणजे तुटली नाही. फक्त घसरली असे झाल्यास त्यासाठी सायकल मॅकॅनिकडे जाण्याची मुळीच गरज नसते. इतके ते सोपे काम आहे. पण हे गृहस्य त्या बाबतीत निरंक्षर असल्यामुळे सायकल गॅरेंजमध्ये गेले आणि चेन चढवायच्या काही सेंकदांच्या कामाचे तीस रूपये देऊन आले. एकदा एक ट्रक आदिवासी समाजाचे लग्नाचे वराड घेऊन जात असतांना गाडी मोठया चढावर चढतांना अचानक बंध पडला नवरदेवाने ड्रायवरला विचारले ट्रक अचानंक बंद का पडला ड्रायवर म्हणाला. गाडीचा मोसम तुटला नवरदेव तातडीने म्हणाला. किती पैसे लागतील ड्रायवर साक्षर होता. त्याने सांगितले पाच हजार नवरदेवानी पटकन पैसे काडून आणि म्हणाला. गाडीचा मोसम तुटला ते घेऊन ये अशा गोष्टीची साक्षरता नसल्याने आदिवासी सारखे अनेक लोक फसतात. एकदा एका

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

घरचा रात्री फ्युज गेला. पण तो बदलण्याची त्याची तार बदण्याची साधी साक्षरता नसल्यामुळे रात्रभर हे कुटूंब अंधारात राहिले सकाळी वीजतंत्री आला आणि पन्नास रूपये व्हिजिट फी घेऊन गेला.

व्यवहारात बाजारात फळे भाजी घेतानाही आदिवासी समाजाची आपली अशीच फसवणूक होते. अनेकदा आपल्यातला नवखेपणा ओळखून भाजीवाला, फळेवाला आपल्याला दीड–दोन पटीनी टोपी घालूनच टाकतो. पैसे तर जातातच जास्त, पण घरी गेल्यावर बायको मुर्खात काढते ते वेगळेच! जास्त दिलेल्या भावासाठी आणि हलक्या दर्जासाठी ऐकावे लागते. असे प्रसंग म्हणजे आपण माहिती साक्षर नाहीत बाजारभाव माहित नसल्याने, आपल्याला त्यातले अगदीच कळत नाही. हे समोरच्याला कळू न देण्याइतके चातुर्य आपल्या मध्ये हवे यालाच म्हणायचे साक्षरता जीवनातल्या प्रत्येक क्षेत्रात आपन निरक्षर नसल्याचे अगदीच हे नसल्याचे दाखवुन देत असतो.

जर आदिवासी समाजाला सर्वागीण विकासातून जीवनामध्ये बदल घडवून आणावयाचे असेल तर आधुनिक युगात माहिती साक्षरतेचे वेगवेगळी जीवनातील प्रसंगाचे माहिती साक्षर असणे काळाची गरज आहे. कारण संशोधन या क्षेत्रात एक रोमांचक वेळ सिध्दांत आणि सराव माहिती साक्षरता जीवनभर शिक्षण गाभ्याशी आलेंक जेंड्रीया यांची घोषणा ठाम मत प्रतिबिंबित करण्यासाठी तो जीवनाच्या सर्व क्षेत्रातील लोकांना माहिती साक्षरताला खुप महत्व आहे.

## आरोग्य साक्षरतेची आजची गरज उदयाची सोय

मानवी आयुष्यात दैनंदिन जीवनात सर्वाधिक संबंध नैसर्गिक रित्याच आरोग्याशी येतो जागे असताना. आणि झोपल्यानंतरही चोविस तास सोप्या शब्दात सांगायचे झाल्यास 'राऊंड द क्लॉक' आरोग्य या विषयाने आपल्याला घेरलेले असते. अगदी बालवयात विचार केल्यास, आरोग्य साक्षरता नसल्याने आपल्या देशात पाच लाख बालकांचा मृत्यू होतो. असा अनुभव आहे. बालकाचे हे मृत्यू प्रामुख्याने पोटांच्या विकाराने होतात. हगवण लागलेल्या बालकांस कपभर पाण्यात चमच भर साखर आणि चिमूटभर मीठ टाकून तयार केलेले. पूर्णपणे घरगुती जीवनजल पाजल्यास त्याचा जीव वाचू शकतो. हे कळण्यासाठी आरोग्याच्या ज्ञानाची अभ्यासाची मूळीच गरज नाही. गरज आहे फक्त आरोग्य साक्षरतेची आरोग्य हा आपल्या इतक्या जिव्हाळयाचा आणि संवेदनशील विषय आहे. की आरोग्य साक्षर आपण असलेच पाहीजे. तरूण पिढीच्या दृष्टीने गेल्या काही वर्षापासुन एच आय व्ही–एड्स आजार फारच

संवेदनशील झाला आहे. शारीरिक संबंधामधून हा जीवघेणा आणि जीवघेण्या वेदना देणारा आजार होतो. हा आजार असूरक्षित शारीरिक संबंधामूळे होतो. ते संबंध असुरक्षित पध्दतीने येऊच नयेत, ही साक्षरता या पिढीजवळ असायलाच हवी आहे. या आजाराने ग्रस्त असलेल्या व्यक्तीचा नुसता चेहरा पाहुन काहीही कळत नाही. हे प्राथमिक ज्ञान निदान तरून वयातील नव्या पिढीजवळ असणे गरजेचे आहे.

एच आय व्ही–एड्स संदर्भात निरक्षर असणे कधीकधी किती वेदनादायी ठरू शकते. याची साक्षरता असायलाच हवी आदिवासीना अनेक आरोग्याविषयक अगदी किरकोळ असतात. तरीही आपण हया गोष्टीची साक्षर होणे खुप महत्वाचे आहे. निसर्गोपचार ही सर्वोत्कृष्ठ उपचार पध्दती आहे. एवढी आरोग्य साक्षरता आपल्याजवळ असायलाच हवी तंबाखू, दारूसारख्ये पदार्थ किवा दृव आणि त्याचा अतिरेक आापल्या जीवनातुन अनेकदा समाज जीवनातुन उठवू शकतात. ही आपल्या आरोग्य साक्षरतेसाठी प्राथमिक बाब आहे. हा तर आरोग्य साक्षरतेचा अगदी बालक मंदिरातील धडा आहे. या सगळया गोष्टीची माहिती साक्षरता असणे जरूरी आहे.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

## पर्यावरण साक्षरता गरजेची

विकास आणि पर्यावरण हे एकमेकांचे विरोधी संकल्पना नसुन त्या एकमेकांना पुरक गोष्टी आहेत. विकास करतांना पर्यावरण संवर्धनही करता येऊ शकते. त्यासाठी पर्यावरण साक्षरतेची आवश्यकता असुन पर्यावरण साक्षरता भविष्याची खरी गरज आहे. असे प्रतिपादन केंद्रीय पर्यावरण मंत्री मा. प्रकाश जावडेकर यांनी व्यक्त केले. समर्थ भारत व्यासपीठाच्या वतीने ठाण्यातील गावदेवी मैदानामध्ये भरविण्यात आलेल्या ग्रीन आयडिया प्रदर्शनामध्ये आयोजित कार्यक्रमामध्ये जावडेकर यांनी उपस्थितांशी संवाद साधला.भविष्यकाळामध्ये इ.कचऱ्याची मोठी समस्या निर्माण होणार असुन सध्या दशभरामध्ये 90 कोटी पेक्षा जास्त मोबाईल धारक आहेत. या मोबाईलधारकांचे मोबाईल पुढील दोन वर्षामध्ये जुने होत असल्याने त्याचे कचऱ्यात रूपांतर होत असून या कचऱ्याची विघटन करने खुप महत्वाचे आहे. हे विघटन शास्त्रीशुध्द पध्दतीने होण्यासाठी कठोर कायदा करण्याची गरज असुन पर्यावरण मंत्रालयाकडून ही कारवाई केली जाईल. पर्यावरण रक्षण घनकचरा व्यवस्थान इ.कचरा व्यवस्थापन, वृक्ष संगोपन, वृक्ष लागवड यांच्याशी निगडीत असुन या संदर्भात देशाचे योग्य धोरण आखले गेले नव्हते. त्यामुळे त्यामध्ये बऱ्याच तृटी होत्या या धोरणामध्ये अमुलाग्र बदल करण्यात आला आहे.

मानव निर्मित जंगल ही भविष्यातील माहिती साक्षरताची गरज असुन वनखात्याच्या अख्यातरितीने जमिनीत व्यतिरिक्त महापालिका क्षेत्रातील आदिवासी भागातील गायरान वनविभागातील जमिनीवरही जगंले उभारण्याची गरज आहे. यासाठी एका महत्वकांक्षी योजनाचा शुभारंभ पुण्यात होत असून भविष्यात देशभरामध्ये त्याची अमलबजावणी करण्यात येईल असे मा.जावडेकर यांनी सांगितले.

जंगल हा आदिवासीचा जीवन आधार आहे. निसर्ग ही आदिवासी समाजाची दैवत मानलेली आहे. जे काही आपल्या जिवनामध्ये जगण्यासाठी आवश्यक वस्तू अन्नधान्य फळे, कंद त्याच्या उदरनिर्वासाठी जे काही लागते ते त्यांना जंगलातून मिळत असते. म्हणून आदिवासी समाजाला जर अधिक पर्यावरण विषयी माहिती साक्षरताचे महत्व कळाले तर आदिवासी समाज जंगलाचे संरक्षण संगोपन आणि संवर्धन स्थानिक आदिवासीच प्रभावीपणे करू शकतील म्हणून आदिवासी समाजाला पर्यावरण या विषयी वेगवेगळी माहिती साक्षरता करून देणे आवश्यक आहे.

## साक्षरता कशाला म्हणतात?

माहितीशी असलेली जवळीक किंवा ओळख म्हणजे साक्षरता होय. साक्षरतेमुळे विशिष्ठ घटकांचा दर्जा काय आहे. त्याचा अवलंब कसा करायचा, या बाबी लक्षात येतात. माहिती साक्षरता म्हणजे काय?

माहितीची जाण असणे तिचे महत्व व तिची उपयुक्तता ओळखणे म्हणजे माहिती साक्षरता होय. ही एक व्यापक संकल्पना आहे. यामध्ये व्यक्ती तिला हव्या असलेल्या माहितीची गरज ओळखु शकते. तसेच माहिती शोधण्याची व त्याचे मुल्यमापन करण्याची व ती परिणामकारकपणे वापरण्याची क्षमता प्राप्त करू शकते. माहितीची आपल्याला किती गरज आहे. ती गरज स्थुल स्वरूपाची आहे. कि सूक्ष्म प्रचंलित आहे. की भुतकालीन याची अचूक जाण असणे म्हणजे माहिती साक्षरता होय.

इन्फर्मेशन इंडस्ट्री असोसिएशन चे अध्यक्ष पॉल.झुरूकाअस्की यांनी इ.स.1974 मध्ये माहिती साक्षरता हा शब्दप्रयोग सर्वप्रथम वापरला. माहिती साधनांचा वापर कसा करावा. याचे प्रशिक्षण झालेली व्यक्ती माहिती साक्षर असणे असे मत त्यांनी मांडले.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

### वेगवेगळी माहिती साक्षरतेची मुल्यमापन

वेगवेगळया माहिती साक्षरता आत्मसात करण्यासाठीचा प्राथमिक भाग म्हणजे माहिती आपल्याला जी प्रतिप्राप्त करायची आहे. तिचे सर्वप्रथम मुल्यमापन करणे त्यासाठी पुढील निकष सांगितले आहेत.

- **अध्ययावतता :** हा एक महत्वाचा निकष आहे. शिळी पुरातन व कालबाहय माहिती दिशाभूल करते. अध्ययावत माहिती अभ्यासाला वेग देते.
- **अचुकता :** माहिती ही अचुकच हवी संदिग्धता, विस्कळीतपणा तसेच मोघम स्वरूप टाळावे.
- **दर्जा :** आवश्यक असण्याचा माहितीचा दर्जा उच्च असावा व ती विश्वसनीय असावी.
- **उपयुत्कता :** माहिती किती उपयुक्त आहे. आपल्या अभ्यासाविषयी जीवन संबध आहे कि नाही ते पहावे.
- **विषयविस्तार :** माहिती आपल्या गरजांची पुरेपुर जुळनारी असावी.

### माहिती साक्षरतेची गरज

सध्या माहितीचा विस्फोट झाल्यामुळे उदयाच येणारी नवेनवे विषय व त्याचे उपविषय यातुन माहिती विखुरली जात आहे. तिला अंतरशाखीय तसेच बहुशाखीय स्वरूप प्राप्त झाले आहे. अशा वेळी माहितीच्या महाजाळयात आपल्या उपयोगाची नेमकी माहिती कोणती, तिची प्रतिप्राप्ती करायची, ती त्वरीत व अचुक कशी मिळवायची याबाबत साक्षर असणे आवश्यक झाले आहे. अन्यथा नको असलेल्या माहितीचा गुंता सोडवण्यातच सर्व वेळ निघुन जाईल व या स्पर्धाच्या युगात आपण मागे पडू हे सर्व टाळण्यासाठीच माहिती साक्षतेची गरज निर्माण झाली आहे. एक उदाहरण घेऊन आपण हा मुध्दा अधिक स्पष्ट करत समजा आपल्या ग्रंथालय वर्गीकरण या विषयची संबंधित माहिती हवी आहे. संगणकावर आपण ग्रंथालय वर्गीकरण ही संज्ञा टाईप केल्यास आपल्याला ग्रंथालय हा शब्द असणारे असंख्य प्रलेख प्राप्त होतात. उदा : शालेय ग्रंथालय डिजीटल ग्रंथालय, ग्रंथालय कर वगैरे तसेच वर्गीकरण हा शब्द समाविष्ट असणारे अनेक प्रलेख प्राप्त होतात. उदा : वनस्पती वर्गीकरण, प्राणी वर्गीकरण वगैरे त्या**तील** बहुसंख्या प्रलेखातील माहिती आपल्या कामाची नसते माहीती साक्षरतेता वापर करत बुलियन ऑपरेटरच्या साहायाणे तयार केलेले शोधविधान टाईपवर मात्र अचूक माहिती प्राप्त होते.

### वेगवेगळया माहिती साक्षरताची उपयुत्कता :

माहिती साक्षरता उपयुक्त ठरण्याची काही कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

- माहिती त्वरीत व अध्ययावत मिळते.
- हवी असलेली माहिती मिळुन ती योग्य व परिणामकारकपणे वापरता येते.
- माहितीच्या स्त्रोताचे मुल्यमापन करता येते.
- माहितीच्या वापराचे आर्थीक, बुध्दीसंपदा कायदा तसेच सामाजिक दुष्टिकोनातुन महत्व समजते.
- माहिती प्रतिप्राप्तीतील अडथळे दुर करता येतात.

### समारोप :

वरिल सर्व विवेचनावरून असे म्हणता येईल की सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी वेगवेगळी माहिती साक्षर हा शब्द पुढे पुढे अधिक व्यापक होत आहे. जगताना आपल्या जिथे जिथे संबंध येते तिथे त्या संदर्भात प्राथमिक

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.

स्वरूपाची माहिती असणे म्हणजेच साक्षरता असे मानले जाऊ लागले. वेगवेगळया माहिती साक्षरता मुळे आदिवासी समाजात विकास शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकिय आणि मुलभूत जीवन जगण्यासाठी वेगवेगळया माहिती साक्षरतेची अतिआवश्यक गरज आहे. लहान लहान समस्या आपल्याला स्वःताला सोडवता येणे त्यामुळे प्रत्येक माणसाला वेगवेगळया माहिती साक्षरताची काळाची गरज आहे. आजच्या स्पर्धेच्या जागतीकीकरण्याच्या युगात आदिवासी समाजाने इतर समाजाच्या प्रवाहाबरोबर राहणे आवश्यक आहे. अन्यथा आपण आदिवासी मागे आहोत तसेच मागे पडून स्पर्धेबाहेर फेकले जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

## संदर्भ

लोकमत मंगळवार दिनांक : 4 ऑक्टोबर 2016

अनिरूध्द पांडे ( तरून भारत 16 September 2016 ) साक्षरता वेगवेगळी ( share on facebook )

मा. प्रकाशजी जावडेकर ( first published 6 June 2015 4:24 am ) पर्यावरण साक्षरता गरजेची

Web Title : Need Environment Awareness Prakash Jawdekar

टंग Environment, Environment, Awareness Prakash Jawdekar

फडके द.ना. (2007) ग्रंथालय संगनिकीकरण आणि आधुनिकीकरण आर. युनिव्हर्सल प्रकाशन,पृ.क्र.440

सोनटक्के शिवाजी ना. (सप्टे–ऑक्टो 2009) ग्रंथ परिवार अंक 7 वा. लेख क्र.5 माहिती साक्षरता काळाची गरज पृ. क्र. 15–16

कांबळे तानाजी (2005) ग्रंथालय व साहितीशात्र फडके प्रकाशन पृ.344

जाधव एम,एस, (नोव्हे–डिसें 2007) ग्रंथ परिवार अंक 11–12 लेख क्र.4 माहिती साक्षरतेचे विविध पैलु पृ.क्र.16–19

गारे गोविंद (1974) आदिवासीचे प्रश्न आणि परिवर्तन अमृत प्रकाशन औरंगाबाद (120)

Government of Maharashtra A Review of Tribal Research Studies Edited By Dr. Govind Gare A Silver Jubilee Volume–1988

सुधीर जोग महाराष्ट्र राज्यातील वनविषयक सवलती व कल्याण योजना (1988) पृ.142

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EIJMR, All rights reserved.